पुढारी

# ‘दूरशिक्षण’कडून प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राच्या वतीने बी. ए., बी.कॉम., एम.ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम. ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम.एस्सी. (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन पदवी व पदव्युत्तर विषयांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. विविध अभ्यासक्रमांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ७७ अभ्यासकेंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना प्रवेश घेता येणार आहे.




प्रथम वर्षासाठी नव्याने ऑनलाई[n] अर्ज सादर करताना ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेच[ी] कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्र[त] अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची मुद[त] नियमितशुल्कासहदि. २५ जुलै, विलं[ब] शुल्कासह दि. १० ऑगस्ट तर दि. २[५] आगस्टपर्यंत अतिविलंब शुल्कास[ह] आहे. www.unshivaji.ac.i[n] या संकेतस्थळावर Distance Education या लिंकव[र] प्रवेशाबाबतची माहिती उपलब्[ध] आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राच[े] संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसो[डे] यांनी दिली आहे.

# महाविद्यालयांत होणार निवडणुका

## विद्यापीठ यंत्रणा गतिमान; माहितीसाठी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन

**कोल्हापूर / वैभव गोंधळी :**

प्रदीर्घ काळानंतर विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये थेट निवडणुकीने विद्यार्थी प्रतिनिधींची निवड केली जाणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने या निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा गतिमान केली असून प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी जिल्हावार कार्यशाळा घेण्याचे नियोजन केलेले आहे. विद्यार्थी दशेतून पुढे आलेल्या अनेक तरुणांनी पुढे राजकारणात नेतृत्व केले. विद्यार्थी निवडणुकांत झालेले गैरप्रकार, वाद आणि हिंसाचार यामुळे थेट निवडणुका घेणे बंद झाले होते; मात्र नवीन विद्यापीठ कायद्यानुसार पुन्हा थेट



निवडणुका घेण्यास मान्यता दिली असून, यातून राजकीय पक्ष आणि नेते कसे बाजूला राहतील, याची काळजी घेण्यात आली आहे. १० मे रोजी महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या राज्यातील ११ विद्यापीठांच्या कार्यशाळेनंतर लगेचच शिवाजी विद्यापीठानेही वेगाने पावले उचलण्यास सुरुवात केली.

शिवाजी विद्यापीठात १५ मे रोजी तिन्ही जिल्ह्यांची एकत्रित कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी प्राचार्य उपस्थित होते. या कार्यशाळेत निवडणुकीचा कायदा बनवणाऱ्या समितीचे सभासद असलेले आनंद मापुस्कर आणि शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले.

या निवडणुका सुरळीत पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने आठ सदस्यीय समितीचे गठन केले. या समितीच्या सूचनेनुसार निवडणूक प्रक्रिया राबवणारे प्राचार्य आणि प्राध्यापक यांची कार्यशाळा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पहिली कार्यशाळा २९ जून रोजी सातारा जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये होणार आहे. दुसरी कार्यशाळा ६ जुलै रोजी कोल्हापूरमधील विवेकानंद महाविद्यालयात होणार आहे, तर तिसरी कार्यशाळा १३ जुलै रोजी सांगली येथील पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडी येथे होणार आहे. यावेळी प्राचार्य आणि प्रत्येक महाविद्यातील पाच प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर प्राचार्य आणि प्राध्यापकांनी आपल्या महाविद्यालयात विद्यार्थी संख्येनुसार कार्यशाळा घ्याव्यात, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत निवडणुकीची माहिती पोहोचविण्याचे जबाबदारी या महाविद्यालयांवर असणार आहे.

### १ जुलैपासून प्रक्रिया

३१ जुलैपूर्वी निवडणूक अधिसूचना काढणे, तर ३० सप्टेंबरपूर्वी विद्यार्थी परिषदेची स्थापना करणे बंधनकारक आहे; मात्र निवडणूक काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, विद्यार्थी निवडणुकीमध्ये अडकून पडू नयेत यासाठी कमीत कमी काळात निवडणूक प्रक्रिया राबवण्याकडे विद्यापीठ प्रशासनाचा कल आहे. त्यासाठी काटेकोर आणि नेटके नियोजन केले जात आहे. १ जुलैपासून निवडणूक कार्यक्रम आखणे व तत्सम कामांना सुरुवात होणार आहे.

# शिवाजी विद्यापीठामध्ये दिव्यांगांसाठी कौशल्य, रोजगार मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात प्रथमच दिव्यांग विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार व कौशल्य मेळावा दि. २८ जून, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे. हा मेळावा सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत मानव्य विद्या इमारतीमध्ये आयोजित केला आहे. या मेळाव्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत कंपन्या सहभागी होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ हे दिव्यांगांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी



नेहमीच प्रयत्नशील असते. त्यामुळे विद्यापीठात दिवसेंदिवस प्रवेश घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालली आहे. दिव्यांग कायदा व दिव्यांगांसाठी असणाऱ्या इतर योजना याबाबत वेळोवेळी जनजागृतीचे कार्यक्रम राबवण्यात येतात. तसेच दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठाने अनेक प्रयत्न केले आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रथमच दिव्यांग विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा रोजगार व कौशल्य मेळावा आयोजित केलेला आहे. या मेळाव्यामध्ये १२ वी उत्तीर्णांपासून ते पदव्युत्तर पदवीधारकांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध केल्या जाणार आहेत. तसेच या मेळाव्यात वेगवेगळे कौशल्य व उद्योजकता विकास याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा मेळावा हा केवळ दिव्यांगांसाठी असून सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच सहभागी विद्यार्थ्यांसाठी चहा, नाष्टा व जेवणाची मोफत सोय केली जाणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी बायोडाटाच्या पाच प्रती, आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र व रंगीत छायाचित्र आणणे गरजेचे आहे. या मेळाव्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशीनकर आणि विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे यांनी केले आहे.